ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 8 | APRIL - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# " सोलापूर शहरातील पर्यटनाच्या नव्या वाटा "



डॉ. प्रा .सोपान जावळे
सौ.सुवर्ण लता गांधी महाविद्यालय वैराग.

## ● प्रास्ताविक :-

सोलापूर शहर हे महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेशाच्या सीमेवर वसलेले असून येथे मराठी, कानडी, तेलगु व मुस्लिम संस्कृतींचा संगम पाहावयास मिळतो. मुंबई-मद्रास रेल्वे मार्गावरील महत्त्वाचे व्यापारी केंद्र असलेले सोलापूर हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. मध्ययुगीन कालखंडात सोलापूर जिल्ह्याच्या सीमारेषा वेगवेगळ्या राज्यांशी जोडल्या गेल्या होत्या. इ. स. १९५६ मध्ये महाराष्ट्र राज्याची पुनर्रचना केल्यानंतर हा जिल्हा द्विभाषिक मुंबई राज्यात समाविष्ट करण्यात आला आणि इ. स. १९६० पासून हा महाराष्ट्राचा महत्त्वाचा जिल्हा बनला.[१] सोलापूर शहरात विविध जाती-धर्माचे लोक राहतात. त्यांच्या बोलीभाषाही वेगळ्या आहेत त्यामुळे सोलापूर हे बहुजातीय व बहुभाषिक शहर म्हणून ओळखले जाते. येथे मराठी, कन्नड व तेलगु अशा त्रिवेणी भाषांचा संगम पाहावयास मिळतो.

सोलापूर शहराच्या ग्रामनामाबद्दल आपल्याला अनेक साधनांतून माहिती मिळते. बाराव्या शतकातील सोन्नलिगे म्हणजेच सोलापूर होय.[२] देवगिरीच्या यादवांच्या शासनकाळात सोलापूर परिसरात वीरशैव संप्रदायाचे मोठे केंद्र होते. या काळात सोलापूर विभागात सोन्नलिगे येथे वीरशैव पंथाचे थोर संत श्री. सिध्दरामेश्वर यांचे मूळ ठिकाण असून त्यांनी तेथे एक तलाव बांधून शिवलिंगाची स्थापना केल्याची माहिती आपणास महाराष्ट्र राज्य गॅझिटियर इतिहास प्राचीन काळ खंड-१ मध्ये पाहावयास मिळते.[३] हाच सोलापूर शहरातील सध्याचा महत्त्वाचा सिध्देश्वर तलाव होय. बहुभाषिक, बहुजातीय सोलापूर शहराला धार्मिक व अध्यात्मिक पर्यटनाच्या दृष्टिकोणातून महत्त्वाचे स्थान आहे.

तसेच आज सोलापूर शहराचा समावेश स्मार्ट सिटीमध्ये करण्यात आल्याने शहरात पर्यटनाच्या दृष्टिकोणातून अनेक नव्या वाटा निर्माण करता येऊ शकतात. शहरातील अनेक धार्मिक व ऐतिहासिक ठिकाणी पर्यटनाला चालना देण्यासाठी उपयुक्त असून त्यामध्ये सिध्देश्वर तलाव, कंबर तलाव (संभाजी तलाव), हिप्परगा तलाव, भूईकोट किल्ला, सिध्दरामेश्वर मंदिर, तसेच शहराच्या सौंदर्यात भर घालणारी इंद्रभूवन इमारत आणि आंतरराष्ट्रीय दृष्टिकोणातून पर्यटकांच्या व अभ्यासकांच्या दृष्टीने महत्त्वाचे माने गेलेले डॉ. द्वारकानाथ कोटणीसांचे स्मारक, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन, किसन सारडा व मल्लप्पा धनशेट्टी या चार हुतात्म्यांचे स्मारक महत्त्वाचे ठरते. यापैकी सिध्देश्वर तलाव, कंबर तलाव व हिप्परगा तलाव हे पर्यटनाच्या दृष्टिकोणातून कसे महत्त्वाचे ठरतात, याविषयी थोडक्यात माहिती येथे देत आहे.

## ● सिध्देश्वर तलाव :-

सोलापूरचे ग्रामदैवत श्री. सिध्दरामेश्वर मंदिराच्या भोवती असणारा हा तलाव ११३६ च्या दरम्यान सिध्दरामेश्वरांनी श्रमदानातून खोदल्याची माहिती मिळते. त्यासाठी शहरातील अनेक लोकांनी त्यासाठी आर्थिक मदत पुरवली होती.[४] या तलावाच्या मध्यभागी सिध्दरामेश्वरांचे पूर्वाभिमुख मंदिर असून तलावाच्या पश्चिमेकडील बाजूस भूईकोट किल्ला आहे. या किल्ल्याच्या बांधकामापूर्वी तेथे सिध्दरामेश्वरांनी बांधलेले मल्लिकार्जुनाचे मंदिर होते. आज ही किल्ल्यात या मंदिराचे अवशेष आपणास पाहावयास मिळतात. या मंदिरात अन्नछत्र उघडल्यानंतर तेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून

सिध्दरामेश्वरांनी आपल्या शिष्यांच्या मदतीने श्रमदानातून या तलावाची निर्मिती केली. नंतरच्या काळात या तलावाला तिर्थाचे स्वरूप प्राप्त झाले.[५] तलावात पाण्याचा साठा वाढावा यासाठी काही विहिरी आणि आड खोदण्यात आले होते.[६] सन १८५२ ते १८६६ या काळात ब्रिटिश सरकारने आणि नगरपालिकेने तलावातील पाणी शुध्द व स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला होता.[७] कारण त्या काळात सिध्देश्वर तलाव हे सोलापूरच्या पाणी पुरवठ्याचे एकमेव साधन होते. त्यामुळे वेळोवेळी तलावातील गाळ व कंजाळ काढून तलाव स्वच्छ करण्याचा प्रयत्न नगरपालिकेकडून वेळोवेळी केला जाई.[८] या तलावाला अनेक दगडी घाट आहेत मात्र हे घाट कधी बांधले याबद्दल माहिती मिळत नाही. तलावाच्या उत्तरेला 'गणपती घाट', ईशान्येला 'विष्णूघाट' असून तेथे विष्णूचे मंदिर आहे. बाजूलाच 'बांगडीघाट' आहे या घाटावर गड्डा यात्रेच्या वेळी बांगड्याची दुकाने थाटली जात. तलावाच्या पूर्वेकडे 'हत्तीघाट' असून या ठिकाणी पंचमुखी मारूतीचे मंदिर पाहावयास मिळते. या मंदिराच्या पाठीमागे असणाऱ्या घाटास 'हनुमान घाट' या नावाने ओळखले जाते. जवळच एकनाथाच्या देवालयाशेजारी 'नाथघाट' आहे. तसेच पठाण हॉल व रिपन हॉल बागेच्या मध्ये 'प्रभूघाट' असून तलावाच्या दक्षिणेस शहाजोहरवलीच्या दर्ग्याच्या पाठीमागे असणारा घाट 'शाहीघाट' नावाने ओळखला जातो. या घाटाच्या शेजारी 'सम्मत्तीकट्टा' घाटावर सिध्दरामेश्वरांच्या काट्यांचे लग्न लावले जाते. सिध्दरामेश्वरांनी स्थापन केलेल्या ६८ लिंगापैकी श्री. परमेश्वर हे लिंग मल्लिनाथ घाटावर आहे. अशा प्रकारे या तलावास अनेक घाट असून प्रत्येक घाटावर छोटी-छोटी मंदिरे पाहावयास मिळतात.[९]

- **कंबर तलाव :-**

शहराच्या दक्षिणेस असणारा हा तलाव 'मोतीबाग कंबर तलाव' किंवा 'धर्मवीर संभाजी तलाव' या नावाने ओळखला जातो. या तलावाच्या घाटावर शहरातील धोबी कपडे धुण्यासाठी येतात. त्यामुळे हा तलाव 'धोबी तलाव' या नावानेही ओळखला जातो.[१०] ब्रिटिश कालखंडात सोलापूर शहराला सिध्देश्वर तलावातून होणारा पाणी पुरवठा कमी पडू लागल्याने या तलावातून शहराला पाणी पुरवठा करण्याची कल्पना पुढे आली. मात्र हा तलाव लष्करी अधिकाऱ्यांच्या ताब्यात असल्याने त्यांच्या संमतीशिवाय या तलावाचे पाणी शहरात आणणे कठीण काम होते. ६८ एकरातील या तलावाच्या पश्चिमेस असणाऱ्या मोतीबागेत (सध्याचे महात्मा गांधी प्राणी संग्रहालय / रेवणसिध्देश्वर बाग) पाण्याचे अनेक झरे होते. त्यामुळे या झऱ्यांच्या ठिकाणी ४० फुट व्यासाची, ५० फुट खोल एक विहिर खणून त्यावर इंजिन बसवून पाईप लाईनद्वारे पाणी गावात आणण्याचा आराखडा तयार करण्यात आला. त्यानुसार १८ डिसेंबर १८५८ रोजी नगरपालिकेने हा ठराव मंजूर केला. ठरावाप्रमाणे सन १८६३ साली विल्यम ब्लिज व जेम्स् विल्यम मॉटरसेड या दोन युरोपियनांनी पिण्याच्या पाण्यासाठी पाईप लाईन करण्याचा मक्ता घेतला. मात्र त्यांच्याकडून हे काम पूर्ण न झाल्याने फेब्रुवारी १८६४ मध्ये रामस्वामी मुदलियार यांना हा मक्ता देण्यात आला. त्यांनी हे काम १८६६ मध्ये पूर्ण केले. मात्र लष्करी अधिकाऱ्यांच्या आडमुठेपणामुळे या पाईप लाईनद्वारे शहरास पाणी पुरवठा होण्यास अनेक अडचणी निर्माण झाल्या.[११] परिणामी या तलावातून शहराला पाणी पुरवठा करण्याची योजना पूर्णपणे फसली गेली. त्यामुळे नगरपालिकेने १० ऑगस्ट १८६५ च्या सभेत अदिला ओढ्यावर एकरूख जवळ तयार होणाऱ्या तलावाचा उपयोग पाणी पुरवठा करण्यासाठी ठराव मान्य करण्यात आला.[१२] सुरूवातीला ६८ एकर जागेत पसरलेला हा नैसर्गिक तलाव हळूहळू लहान होत गेल्याचे दिसून येते. या तलावातील पाणी कमळाच्या फुलांसाठी पोषक असल्याने तलावात कमळे फुलत होती, परंतु अलिकडील काळात कपडे धुण्याने पाणी दुषित होऊन कमळे नष्ट झाली आणि कमळाच्या फुलांची जागा जलपर्णीने घेतली. तरी ही या तलाव परिसरात देश-विदेशातून वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी वनविहारासाठी येतात. त्यामध्ये हावीस, कुटस, शेकाट्या, जांभळ्या रंगाचे मुरहेन, पानकावळा, ब्रांन्झ, विंग्ड, ससाणा, बदके, खंड्या इत्यादी पक्षांचा समावेश असतो.[१३] ही पक्षी निरीक्षकांसाठी व पर्यटकांसाठी पर्वणीच आहे.

- **हिप्परगा तलाव :-**

सोलापूर शहराला सिध्देश्वर तलावाचे पाणी कमी पडू लागल्यानंतर कंबर तलावाचे पाणी शहरात आणण्यासाठी जी योजना राबवली गेली ती पूर्णपणे फसली गेल्याने पाण्याचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी तत्कालिन इंजिनियर कॅंपबेल यांनी एकरूख (हिप्परगा) तलाव योजना अंमलात आणण्यायचे निश्चित केले.[१४] हा तलाव सोलापूरच्या उत्तरेस ८ कि.मी. अंतरावर हिप्परगा गावाजवळ असून या तलावाचा कच्चा आराखडा कॅप्टन फाईफ यांनी १८६३ साली तयार केला होता. मंजूरीनंतर तलावाच्या प्रत्यक्ष कामाला सुरूवात १८६६ मध्ये झाली. बांध घालण्याचे काम डिसेंबर १८६९ मध्ये पूर्ण झाले. १८७० च्या पावसाळ्यात हा तलाव पाण्याने पूर्णपणे भरला. या तलावाच्या कॅनॉलमधून १८७१ मध्ये प्रथम शेतीसाठी पाणी सोडण्यात आले. ७००० फुट लांब व ७६ फुट उंच असलेला हा बंधारा पाण्याने पूर्ण भरल्यानंतर त्याचे पाण्याचे क्षेत्र सुमारे ७ चौरस मैल इतके पसरत होते. पाण्याची खोली ५९ फुट असून लो लेव्हल कॅनॉलच्या मुखारील पाणी ३३१० M.C. Ft. (दशलक्ष घनफुट) आहे.

ऑक्टोबर १८७५ ते जून १८७७ या काळात दुष्काळ पडल्याने तलावाचे पाणी हळूहळू कमी होत जाऊन ९ जून १८७७ रोजी १६.२५ फुट असल्याचे आढळून आले होते.[१५] कँपबेल यांनी या तलावातून सोलापूरसाठी पिण्याच्या पाण्याची योजना अंमलात आणण्याचे ठरविल्यानंतर त्यांनी त्याचा खर्च २ लाख रूपये काढला. तसेच तत्कालिन इरिगेशन खात्यातील इंजिनियर सी. टी. बर्क यांनी कच्चा आराखडा तयार करून त्याचा अंदाजे खर्च २,१३,९३४/- रूपये इतका सांगितला. परंतु ही योजना अत्यंत खर्चिक असल्याने मंजूर होऊ शकली नाही.[१६] त्यामुळे बर्क यांनी १८७८ मध्ये हिप्परगा तलावातून सोलापूरला पाणी पुरवठा करण्यासाठी तीन पर्याय नगरपालिकेपुढे ठेवले. ही तीन ही पर्याय आपणास शतसांवत्सरिक ग्रंथात पाहावयास मिळतात. परिणामी विचाराअंती बर्क यांची तिसरी योजना सर्वानुमते मंजूर करण्यात आली आणि ५ नोव्हेंबर १८७९ रोजी प्रत्यक्ष कामास सुरूवात झाली. २२ जुलै १८८१ रोजी मुंबईचे तत्कालीन गव्हर्नर जेम्स् फर्ग्युसन यांच्या हस्ते वॉटर वर्क्सचे उद्घाटन करण्यात आले आणि सोलापूर शहराला नगरपालिकेने भरपूर व शुध्द पाण्याचे आश्वासन पूर्ण केले.[१७] अशा रितीने ब्रिटिश कालखंडात सोलापूर शहरास या तीन तलावातून पाणी पुरवठा करण्याच्या योजना आखण्यात आल्या होत्या. त्यापैकी हिप्परगा तलावातून आज ही शहरास कमी खर्चात पाणी पुरवठा केला जाऊ शकतो. कारण ब्रिटिशांनी या तलावातील पाणी ग्रॅव्हीटी (विना पंप) पध्दतीने शहरात आणल्यामुळे विजेची गरज भासणार नाही. त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेचे वर्षाकाठी अंदाजे १५ ते १६ कोटी रूपये वाचणार आहेत.

आज सोलापूर शहर स्मार्ट सिटीच्या दिशेने वाटचाल करताना शहरातील हे तिनही तलाव नैसर्गिक पर्यटनाच्या दृष्टिकोणातून अत्यंत महत्त्वाचे आहेत. सोलापूरचे ग्रामदैवत श्री. सिध्दरामेश्वरांचे मंदिर हे धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच त्या भोवती असणाऱ्या तलावामुळे मंदिराला आणि शहराला नैसर्गिक सौंदर्य प्राप्त झाले आहे. अमृतसर येथील सुवर्ण मंदिराच्या धर्तीवर श्री. सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीने श्री. सिध्देश्वर सुवर्ण मंदिर प्रकल्प हाती घेतला असून या प्रकल्पात सिध्देश्वर तलाव व तलावाचा परिसर प्रेक्षणीय करण्याचा समावेश आहे. हे करीत असताना तलावाच्या घाटांचा आणि त्यावर असणाऱ्या विविध मंदिरांचाही विकास होणे गरजेचे आहे. असे झाल्यास सोलापूरचे ग्रामदैवत सिध्दरामेश्वर मंदिर धार्मिक पर्यटन क्षेत्र म्हणून नक्कीच नकाशावर येईल.

स्मार्ट सिटीच्या अनुषंगाने सोलापूर महापालिकेने कंबर तलाव सुशोभिकरणाचे काम ही हाती घेतले आहे. पूर्वी कंबर तलावात कमळाची अनेक फुले फुलायची मात्र धोबी घाटामुळे तलावाच्या सौंदर्याला धक्का पोहचला पाणी आम्लीय होऊन कमळे नष्ट झाली आणि कमळाची जागा जलपर्णीने घेतली. त्यामुळे तलावातील जीवसृष्टी धोक्यात आली आहे. महापालिका व स्वयंसेवी संस्था प्रयत्न करत आहेत पण त्याला म्हणावे तसे यश मिळत नाही. या जलपर्णीचा कायमचा बंदोबस्त करणे गरजेचे आहे. कंबर तलाव परिसर हा सोलापूरच्या पर्यटनाच्या दृष्टिकोणातून अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण या तलावाच्या जवळ स्मृतीवन, रेवणसिध्देश्वर मंदिर, महात्मा गांधी प्राणी संग्रहालय इत्यादी प्रेक्षणीय स्थळे आहेत. या सगळया स्थळांचा मिळून विकास केला तर भविष्यात हे ठिकाण सोलापूरातील महत्त्वाचे पर्यटन स्थळ म्हणून नावारूपाला येईल. या तलाव सुशोभिकरणासाठी राज्य शासनाकडून ५ कोटींचा निधी मंजूर झाला असून हा निधीचा पुरेपूर वापर होणे महत्त्वाचे आहे. शांत व निसर्गरम्य असा हा कंबर तलावाचा परिसर पक्षी प्रेमींसाठी महत्त्वाचा आहे. कारण अनेक देशी-विदेशी पक्षी विहारासाठी येतात. म्हणून शासनाकडून मिळालेल्या निधीचा योग्य तो वापर करून या परिसराचा पर्यटन स्थळ म्हणून विकास केल्यास स्थानिक पर्यटकांबरोबरच देशी-विदेशी पर्यटकांनाही या निसर्गरम्य परिसराचा आनंद घेता येईल.

सोलापूर शहराला ब्रिटिश काळापासून पाणी पुरवठा करणारा हिप्परगा तलाव परिसर देखील पर्यटन विकासासाठी अत्यंत उपयुक्त आहे. पूर्वी येथे बाग होती पण ती सध्या सुस्थितीत नाही. पर्यटन स्थळ म्हणून येथे पिकनिक स्पॉट, मत्स्यालय तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील कन्हेरी आणि आलमट्टी धरणाजवळील बागेप्रमाणे शिल्पाद्वारे योगाचे आणि प्राणायामाचे महत्त्व पटवून देता येईल. त्यामुळे देशी पर्यटकांबरोबरच विदेशी पर्यटकही आकर्षित होऊ शकतील. वृक्षारोपणाद्वारे मोठ्या प्रमाणात वनीकरण होऊ शकते. याशिवाय हिप्परगा तलाव परिसरात विदेशी पक्ष्यांच्या प्रजाती मोठ्या प्रमाणात वास्तव्यास येत असल्याने पक्षी निरीक्षण केंद्र व पर्यटकांसाठी निवास व्यवस्था केल्यास पक्षी पर्यटक आकर्षित होतील. राज्य आणि केंद्र शासन सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रस्ता बहुपदरीकरणामुळे आणि येथे होऊ शकणाऱ्या पर्यटन संकुलमुळे पर्यटकांना हे स्थान आकर्षित करू शकेल.

केंद्र शासनाने स्मार्ट सिटी विकसित करण्यासाठी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये वृक्षारोपण, पर्यावरण संतुलन, पर्यटनाभिमुख रोजगार निर्मिती, शहर सुशोभिमकरण इत्यादी योजनांचा समावेश केला आहे. या योजनांमध्ये सोलापूर महानगरपालिकेने जर या शहरातील या तिन्ही तलावांचा विकास केला तर सोलापूरला पर्यटनाच्या दृष्टिकोणातून याचा नक्कीच फायदा होणार आहे.

**संदर्भ सूची :**

१) गॅझिटीय ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, सोलापूर डिस्ट्रीक्ट, १९७७, पृ. क्र. १, २.
२) लिगाडे जयदेवीताई, श्री सिध्दारामाची त्रिविधी, कन्नडकोटी प्रकाशन, सोलापूर, १९५८, प्रस्तावना, पृ. क्र. ४.
३) महाराष्ट्र राज्य गॅझिटियर इतिहास : प्राचीन काळ, खंड-१, पृ. क्र. ६९३ - ६९४.
४) सोलापूर डिस्ट्रीक्ट गॅझिटीयर, १९७७, पृ. क्र. ९७८.
५) सरदेसाई गो. स., मुसलमानी रिसायत, खंड-१, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ. क्र. २३३.
६) जक्कल वि. न., सोलापूर शहर इतिहास, सोलापूर समाचार प्रेस, १९२८, पृ. क्र. ८३.
७) General Dept. File Vol. XVII, १८५१, p. २७७ (B.A.)
८) गॅझिटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, १८८४, खंड-२०, पृ. क्र. ४९५.
९) सोलापूर समाचार, १३ जानेवारी १९५६.
१०) कुलकर्णी ग. प., उपरोक्त पृ. क्र. ९.
११) कित्ता, पृ. क्र. ९.
१२) कित्ता, पृ. क्र. ८५ - ८६.
१३) भूर्के श्याम, मुक्काम पोस्ट सोलापूर, १९९४, पृ. क्र. ११, १२.
१४) कित्ता, पृ. क्र. ९५, ९६.
१५) कित्ता, पृ. क्र. ९३, ९४.
१६) कित्ता, पृ. क्र. ९७, ९८.